नियमित दिवाणी दावा क्र.४/२०१४
सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–००००१८–२०१४

## निशाणी क्र.१८५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी क्र.७ब यांचे नाव दाव्यातून कमी करुन दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, प्रस्तुत दावा वादीने वाटप व ताकिदीचे दादी करिता दाखल केला आहे. मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.७ मयत असून प्रतिवादी क्र.७ब ही त्यांची विवाहीत मुलगी आहे. तिचे पत्त्याबाबत प्रयत्न करुनही वादीस माहिती मिळालेली नाही. तरी प्रतिवादी क्र.७ब हिचे नाव दाव्यातून कमी करणेस व दाव्यात दुरुस्ती करणेस वादीस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन विरोध दर्शवला आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप व ताकिदी करिता दाखल केलेला आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी मुद्दे निश्चीती करण्यात आली आहे. परंतु,अदयाप पावेतो वादी यांनी आपल्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी अदयाप पावेतो सुनावणी सुरु झालेली नाही. वादी यांनी आपल्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.७ब हिचे नाव कमी करुन तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी जरी विरोध दर्शवला असला तरी वादी यांनी केलेली मागणी मान्य केल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु वादीयांनी केलेल्या मागणीचे स्वरुप पाहता, वादी यांच्यावर

कॉस्ट बसवणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.१८५ वादी यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांस खर्चाची रक्कम रुपये २००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.12.08 14:40:46 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः ०८/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड